# भारतातील अंतर्गत सुरक्षिततेची आव्हाने

प्रा. (डॉ.) रविंद्र पांडुरंग भणगे
प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रस्तावना

अंतर्गत सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी भारताला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. अंतर्गत सुरक्षा म्हणजे देशाच्या सीमाअंतर्गत असणारी सुरक्षा, ज्यामध्ये शांतता, कायदा आणि सुव्यवस्था व देशाचे सार्वभौमत्व अबाधित ठेवणे इत्यादी बाबींचा समावेश होतो. भारतात अंतर्गत सुरक्षेची जबाबदारी गृह मंत्रालयावर आहे तर बाह्य सुरक्षेची जबाबदारी संरक्षण मंत्रालयावर आहे. दीर्घकालापासून जम्मू आणि काश्मीर हे राज्य दहशतवाद आणि दहशतवादी कारवायांनी ग्रासलेले आहे. तसेच ईशान्येकडील राज्ये घुसखोरी व वांशिक चळवळी, संघटित गुन्हेगारी, सीमेपलीकडून अवैधरीत्या होणारी मादक पदार्थाची तस्करी इत्यादी समस्यांनी प्रभावित झालेली आहेत. सद्यरूस्थितीमध्ये दहशतवाद आणि दहशतवादी कारवाया देशाच्या अनेक राज्यांमध्ये घडत आहेत. धार्मिक दंगे, भाषिक वाद, विविध राज्यांतर्गत असणारे वाद, नवीन तंत्रज्ञान अर्थात मोबाइल, इंटरनेट, समाजमाध्यमे, संकेतस्थळे यामुळे एखाद्या विशिष्ट द्वेषपूर्ण विचारसरणीचा प्रसार करणे यांसारख्या घटना घडत आहेत. अशा आव्हानात्मक समस्या देशातील विविधतेतील एकता आणि अखंडतेला बाधा पोहोचवत आहेत. यामुळे सामाजिक सलोखा आणि अंतर्गत सुरक्षेपुढे प्रचंड मोठे आव्हान निर्माण झालेले आहे.

भारतातील अंतगर्त सुरक्षितता -

सुरक्षा या घटकामध्ये भारताच्या अंतर्गत सुरक्षेसंबंधी मुद्द्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. यामध्ये डाव्या विचारसरणीचा दहशतवाद अर्थात नक्षलवाद, सीमेपलीकडून होणारी घुसखोरी, दहशतवाद, वाढता प्रादेशिकवाद, पूर्वेकडील राज्यांमध्ये होणारी घुसखोरी व वांशिक चळवळी, जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद, आंतरराष्ट्रीय सीमांसंबंधी असणारे वादविवाद, संघटित गुन्हेगारी, अवैध पसा हस्तांतरण, सीमेवर अवैधरीत्या होणारी मादक पदार्थाची तस्करी आणि तिचे संघटित स्वरूप, सततचे होणारे भाषिक वाद, धार्मिक दंगे, सायबर सुरक्षा, माध्यमे आणि समाजमाध्यमे, संकेतस्थळे यांचा होणारा वापर याद्वारे देशातील सामाजिक सलोख्याला, सुरक्षिततेला निर्माण होणारे आव्हान इत्यादी बाबी आहेत. या आव्हानाला सामोरे जाताना भारत सरकारने आखलेली रणनीती ज्यामध्ये सीमा सुरक्षा आणि व्यवस्थापन अधिक सक्षमरीत्या राबविणे, सीमेलगतच्या भागाचा विकास घडवून आणणे, याचबरोबर सागरी सुरक्षा अबाधित राखणे, इत्यादी महत्त्वाच्या बाबींचा समावेश होतो.

## १. दहशतवाद

भारतात वैचारिक पातळीवरचा दहशतवाद हा जसा धार्मिक स्वरूपाचा आहे तसाच नक्षलवादी विचारसरणीतूनदेखील दहशतवाद निर्माण होताना दिसून येतो. हे दोन्ही लढ्याची वेगवेगळ्या वैचारिक बैठकींचा करतात परंतु लढयाचे स्वरूप समान आहे. या लढयांना सामोरे जाण्यासाठी आपण अजूनही पारंपरिक स्वरूपाच्या संघर्षाचे व्यवस्थापन करताना बळाचा वापर करावा लागतो, दहशतवादी कारवायांना प्रतिबंध करण्याची गरज असते. तसा प्रतिबंध केल्याशिवाय संघर्षाचे निराकरण करता येत नाही. निराकरण करण्याची प्रक्रिया ही सर्वांगीण विकास साध्य करण्याची असते, त्यासाठी शांतता व स्थैर्याची गरज असते. परंतु अशा प्रकारे प्रतिबळाचा वापर केला, तर आज आपण मानवी हक्कांच्या बागुलबुवात अडकतो. भारताला हा लढा वैचारिक पातळीवर करायचा असेल, तर 'काऊंटर आयडिया' या दोन संकल्पनांच्या आधारे साध्य करता येते. एक तर भारतीय राष्ट्रवाद किंवा

दुसरा भारतीय संस्कृती हा आहे. परंतु या दोन्ही विचारांच्या काही मर्यादा आहेत. भारताच्या राष्ट्रवादाच्या आखणीत जेव्हा आपण भारतीय इतिहासाचा, परंपरा किंवा संस्कृतीचा वापर करतो, तेव्हा आपण मुख्यत्वे नर्मदेच्या उत्तरेकडील भारतावर भर देतो. सिंधू संस्कृतीपासून प्राचीन सामराज्यांचा आणि पुढे मुघलकालीन इतिहासाचा अभ्यास हा भारताचा इतिहास होतो. त्यात दक्षिण भारत किंवा पूर्वोत्तर राज्यांच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाचा क्वचित उल्लेख होतो. भारतीय राष्ट्रवादाच्या बाबतची नेहरूंची 'वैविध्यातून ऐक्याकडे' ही संकल्पना कागदावरच राहते. राष्ट्रवादाच्या या संकुचित बठकीच्या ज्या मर्यादा आहेत तशाच भारतीय संस्कृतीचा 'काऊंटर आयडिया' म्हणून वापर करताना जाणवतात.

## २. संघटित गुन्हेगारी

संघटित गुन्हेगारी विविध समस्या व प्रश्नय मात्र बेसुमार वाढत आहेत. त्यावरती उपाययोजना करणे हे सरकारला एक आव्हानच आहे. देशातील गुन्हेगारीही दिवसेंदिवस वाढते आहे. खून, घरफोड्या, चोऱ्यां, दरोडे, खुनी हल्ले, बलात्कार, अपहरणे यांच्या संख्येत होणारी वाढ ही चिंतेची बाब ठरली आहे. वाढत्या गुन्हेगारीला अनेक कारणे आहेत. गुन्ह्यांचा तपास लावण्यात पोलीस यंत्रणेला येणारे अपयश नि विविध स्वरूपाच्या गुन्ह्यासाठी आरोपपत्र दाखल झालेल्या आरोपींची पुराव्याअभावी न्यायालयाकडून होणारी निर्दोष सुटका ही प्रमुख कारणे आहेत. पोलिसयंत्रणा तपासकामात कमी पडते यालाही तशीच कारणे आहेत. पोलिसांना जनतेकडून व सरकारकडूनही हवे तेवढे व हवे तसे सहकार्य मिळत नाही. साक्षीदार म्हणून पुढे येण्यास सहसा कुणी तयार होत नाही. खुनासारखे गंभीर गुन्हे घडण्यामागे सबळ कारणे असतात. सर्रासपणे होणारे खून हे पूर्व वैमनस्यातून होतात किंवा अन्यही कारणे आहेत. दरोडेखोर हवी तेवढी संपत्तीची लयलूट करण्यास मिळाली नाही, दागिने, रोख रक्कम आदी स्वरूपात घबाड हाती लागले नाही तर दरोडा घातलेल्या घरमालकाचा अखेर खून करून आपली कुकर्माची तृष्णा भागवतात. महिलांवर होणारे अत्याचार तर फारच वाढले आहेत. युवा पिढीची सुटका व्हावी म्हणून त्यांच्या पालकांना, सरकारला खरोखरच वाटत असेल तर लहानपणी संस्कारक्षम वयातच मुलांवरती चांगले संस्कार करण्यावर पालकांनी भर द्यायला हवा. तसेच त्यांना मिळणारे शिक्षण हे मूल्याधिष्ठित कसे होईल यासाठी निकराचे प्रयत्न व्हायला हवेत. गुन्हेगारी आदी बाबींना आळा बसावा म्हणून जनता-पोलीस-राजकारणी नि सरकार यांच्या वतीने प्रामाणिकपणे सामूहिक प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे.

## 3. समाजमाध्यमे

सामाजिक माध्यमांचा उपयोग जसा विघातक आहे तसाच तो विधायकही होऊ शकतो. चांगली, लोकांना फायदेशीर ठरेल अशी माहिती काही जणांकडून सामाजिक माध्यमातून पाठविता येते. आपल्या हातात असलेले सामाजिक माध्यमाचे हत्यार जर प्रत्येकाने जबाबदारीने वापरले तर त्याचा संकटसमयी आणि सरकारवर अंकुश ठेवण्यासाठी चांगला उपयोग होऊ शकतो, मात्र या माध्यमाचा गैरवापर वाढत गेला तर सरकार यावर बंधने आणेल आणि हे लोकशाहीला व देशाच्या सुरक्षाला घातक ठरेल. माणसांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला १९९० च्या दशकात विकसित झालेल्या इंटरनेटवर आधारित तंत्रज्ञानामुळे एक नवी दिशा आणि अधिक शक्ती मिळाली. इंटरनेटने माणसे क्षणात एकमेकांशी जोडू शकतात. एकमेकांशी संभाषण करण्यासाठी अथवा आपले विचार लोकांपुढे मांडता यावे यासाठी अनेक ऑप्लिकेशन विकसित करण्यात आले आहेत. अशा ऍपची मालकी जरी दुसरयाकडे असली तरी त्याचा वापर जनसामान्य आपल्या परस्पर दळणवळणासाठी साधारणतः कोणत्याही बंधनाशिवाय करू शकतात. माणूस एक सामाजिक प्राणी असल्यामुळे त्याला इतर माणसांशी जोडायला आवडते आणि ज्या ऍप्सद्वारे माणसे एकमेकांशी जोडली जातात त्या माध्यमाला सामाजिक माध्यम म्हटले जाते.

आज सामाजिक माध्यमाचे हजारो ऍप्स उपलब्ध आहेत आणि यातील बहुतेक सर्वच ॲप्सचा वापर विनामूल्य होऊ शकतो, तसेच इंटरनेटच्या वापराचे दरदेखील स्वस्त झाले आम्हणून सामाजिक माध्यमाचा वापर

मोठया प्रमाणात वाढला आहे. आपले विचार आणि आपली कलाकृती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या हातात एक प्रभावशाली हत्यार आहे याची लोकांना जाणीव झाली आणि त्याचा सर्रास वापर होऊ लागला. हत्यार कोणतेही असले तरी त्याचा वापर कसा करावा हे वापर करणारयावर अवलंबून असते. अयोग्य वापर घातक ठरू शकतो. तसेच सामाजिक माध्यम या हत्याराच्या बाबतीत आहे. त्याचा गैरवापर घातक ठरतो आणि आपल्या देशातदेखील हे दिसून येत आहे.सामाजिक माध्यमांचा वापर करणारे काही जण त्यांनी पाठविलेला संदेश अथवा मजकूर समाजाला किती घातक आहे याचा विचार करत नाहीत. अशा संदेशात दुसरयाकडून आलेले आणि पुढे इतरांना पाठविण्यात येणारया संदेशांचादेखील समावेश आहे. सामाजिक वापर अफवा पसरविण्यासाठी पण केला जातो, कधी जाणीवपूर्वक तर कधी अनाहुतपणे. इंटरनेटद्वारा आणि सामाजिक माध्यमाने त्याचा वापर करू शकणारया सर्वांनाच समान अभिव्यक्ती स्वतंत्र असते आणि ते तसेच असावे. मात्र वस्तुतः तसे होताना दिसत नाही. सामाजिक माध्यमातून एखाद्या व्यक्तीला त्रास देणे, शिव्या देणे, धमकावणे, त्या व्यक्तीबद्दल खोटी माहिती देणे, अशा गोष्टी होत असतात आणि याला 'ट्रोलिंग' म्हणतात. आपल्या हातात असलेले सामाजिक माध्यमाचे हत्यार जर प्रत्येकाने जबाबदारीने वापरले तर त्याचा संकटसमयी आणि सरकारवर अंकुश ठेवण्यासाठी चांगला उपयोग होऊ शकतो, मात्र या माध्यमाचा गैरवापर वाढत गेला तर सरकार यावर बंधने आणेल आणि हे लोकशाहीला घातक ठरेल. सध्या हे एक आव्हान भारताच्या सुरक्षे समोर आहे.

## ४. ईशान्येकडील घुसखोरी व वांशिक चळवळीचे आव्हान

आसाम मधल्या दंगली, देशातील वेगवेगळ्या शहरांत ईशान्य भारतीयांवर होणारे हल्ले आणि त्यांनी आपली मायभूमी गाठण्यासाठी जिवाच्या आकांताने घेतलेली धाव यांमुळे पुन्हा एकदा ईशान्य भारत चर्चेत आला आहे. स्वतंत्र भारतात मनाविरुद्ध सामिल झालेल्या, फाळणीमुळे नुकसान झालेल्या, विकास खुटलेल्या आणि उर्वरित भारतापासून वेगळ्या पडलेल्या या भूमीला झालेल्या जखमा खूप जुन्या आहेत. त्या जाणून घेणं आपल्यासाठी खूप गरजेचं आहे.ईशान्य भारतातील सात राज्यांना एकत्रितपणे 'सात भगिनी' या नावाने ओळखले जाते. आसाम, मेघालय, त्रिपुरा,मिझोराम, मणिपूर, नागालँड आणि अरुणाचल प्रदेश, ही ती सात राज्ये. भौगोलिकदृष्ट्या सिक्कीमचाही ईशान्य भारतात समावेश होतो ब्रिटिशांचे साम्राज्य भारतात पसरत होते त्या काळात मणिपूर, त्रिपुरा, नागालँड या भागांत वेगवेगळी राजघराणी राज्य करीत होती. भारतीय उपखंडाच्या संरक्षणाच्या दृष्टीने ब्रिटिशांसाठी हा प्रदेश अतिशय महत्त्वाचा होता. तसेच इथल्या डोंगरउतारांवर चहाचे मळे लावून व्यापार करण्यार्या ब्रिटिश जमीनदारांसाठीही हा प्रदेश महत्त्वाचा होता. दुसर्या महायुद्धामध्ये जपानने उडी घेतल्यानंतर आग्नेय आशियातल्या जवळजवळ सर्व देशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. १९४७मध्ये भारत स्वतंत्र झाला, तेव्हा आसाम आणि नेफा आपोआपच भारतात सामिल झाले स्वातंत्र्य मिळाले त्या वेळी आसाम हे भारतीय संघराज्यातील एक राज्य होते, तर त्रिपुरा आणि मणिपूर यांना केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा होता. १९७२मध्ये त्रिपुरा आणि मणिपूर यांना राज्याचा दर्जा मिळाला. जुन्या आसाममधून १९६३मध्ये नागालँड, १९७२मध्ये मेघालय, आणि १९८७मध्ये मिझोराम ही राज्ये तयार झाली. तर १९७५मध्ये नेफा आसामातून वेगळा करून त्याला अरुणाचल प्रदेश हे नाव देण्यात आले. स्वातंत्र्यानंतर ईशान्य भारतातील सर्वच राज्ये विविध कारणांनी घडलेल्या हिंसाचाराला तोंड देत आहेत. पूर्व बंगालमधून आलेल्या बंगाली स्थलांतरितांमुळे त्रिपुरा राज्यात मूळच्या आदिवासींवर अल्पसंख्याक होण्याची पाळी आली. त्यामुळे तिथे सुरुवातीच्या काळात वांशिक दंगली झाल्या. केंद्र सरकारकडून अन्याय झाल्याची भावना, राज्यपुनर्रचना आयोगाने आसामातून वेगळे काढून नवे राज्य निर्माण करायला दिलेला नकार, यातून मिझोराममध्ये असंतोष पसरला आणि त्याचे रूपांतर थेट फुटीरतावादात झाले. १९६०च्या दशकात मिझो नॅशनल फ्रंट आणि तिचे नेते लालडेंगा यांनी भारतातून फुटून

स्वतंत्र होण्यासाठी सशस्त्र चळवळ उभी केली. त्रिपुरातील आदिवासींसाठी वेगळी विकास परिषद निर्माण केली गेली.

ईशान्य भारतातल्या फुटीरतावादाचा मुकाबला करण्यासाठी भारतीय संसदेने १९५८मध्ये 'आर्म्ड फोर्सेस स्पेशल पॉवर्स अॅक्ट' (आफ्स्पा) हा कायदा पास केला. सुरुवातीला हा कायदा आसाम आणि मणिपूर राज्यांमध्ये लागू झाला. १९७२मध्ये आसाम राज्याची पुनर्रचना होऊन नवी राज्ये धृ केंद्रशासित प्रदेश तयार झाल्यानंतर हा कायदा सर्वच ईशान्य भारतात लागू केला गेला. आफ्स्पा हा एक राक्षसी कायदा आहे. लोकशाहीला कलंक लावणार्या आणि मूलभूत मानवी हक्कांची पायमल्ली करणार्या अनेक तरतुदी या कायद्यात आहेत. या कायद्याखाली येणार्या प्रदेशात लष्कराची सत्ता चालते, आणि संशयित व्यक्तीला चौकशीविना ठार मारण्याचा अतिरेकी अधिकारही लष्करी अधिकार्यांना दिला गेला आहे. लष्करी अधिकार्यांकडून या कायद्याचा अतिवापर झाल्याच्या, तसेच निरपराध नागरिकांचे बळी घेण्याच्या अनेक घटना मानवाधिकार आयोगापुढे आल्या आहेत. या प्रकरणी लक्ष घालून केंद्र सरकारने २००४मध्ये न्या. जीवन रेड्डी आयोग नेमला. त्या आयोगाने आफ्स्पा रद्द करण्याची स्पष्ट शिफारस करूनही आजही हा कायदा अस्तित्वात आहेच. काहीशा मनाविरुद्ध भारतात सामिल झालेल्या, फाळणीमुळे नुकसान झालेल्या, विकास खुंटलेल्या आणि उर्वरित भारतापासून ('चिकन नेक' चा अपवाद वगळून) भौगोलिकदृष्ट्या तुटलेल्या ईशान्य भारतातील जनतेवर आफ्स्पा कायदा लादून केंद्र सरकारने आणि भारतीय जनतेने अपरिमित असंवेदनशीलता दाखवली आहे. या प्रदेशात वारंवार उसळणा-या हिंसाचारामागे सतत बदलणारे लोकसंख्येचे संतुलन, आर्थिक विकासाचा अभाव,रोजगाराचा अभाव, देशाच्या इतर भागाकडून सापत्न वागणूक मिळत असल्याची भावना, अशी अनेकविध कारणे आहेत. बांगलादेशीयांची कथित घुसखोरी, या एकमेव कारणाने त्याचे स्पष्टीकरण होत नाही. त्याला धार्मिक-जातीय रंग देणे, हेही चूकच आहे. सध्या आसाममध्ये सुरू असलेल्या दंगली या धार्मिक नसून प्रामुख्याने वांशिक आहेत. मूळचे बोडो आदिवासी विरुद्ध 'बाहेरून आलेले' असा आहे. याच प्रकारच्या वांशिक दंगली पूर्वी त्रिपुरामध्ये होत होत्या. तिथे हिंदू धर्म मानणार्या आदिवासी जमाती आणि पूर्व बंगालातून स्थलांतर करून आलेले बंगाली हिंदू यांच्यात वांशिक संघर्ष होता. तेव्हा त्रिपुरात मूळ आदिवासी अल्पसंख्य झाले होते, आज बोडो प्रदेशात बोडो अल्पसंख्य आहेत. ईशान्य भारतातील हिंसाचाराकडे आपण संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. विजेचा तुटवडा कमी करणे, रस्ते बांधणे, प्रमुख शहरे स्वस्त विमानसेवेने जोडणे, शक्य तिथे औद्योगिक प्रकल्प उभे करून स्थानिकांसाठी रोजगार तयार करणे, तिथल्या नितांत सुंदर पर्यावरणाची कमीत-कमी हानी आणि तिथल्या साधनसंपत्तीचा अधिकाधिक विशेषतः स्थानिकांच्या हितासाठी वापर ही उद्दिष्टे समोर असली पाहिजेत. तसेच विकासयोजनांमध्ये स्थानिकांच्या गरजांना प्राधान्य आणि नियोजनात स्थानिकांना प्रतिनिधित्व देणे आवश्यक आहे. भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणाच्या काही निर्णयांमध्ये ईशान्य भारताच्या समस्येविषयी जाणीव दिसून येते. ब्रह्मदेश आणि बांगलादेश या दोन शेजारी देशांशी आपले चांगले संबंध असणे ईशान्य भारताच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे आहे. ब्रह्मदेशाच्या पूर्वीच्या लष्करशहांशी जुळवून घेऊन आपण ईशान्येतील बंडखोरांचे पळून जाण्याचे मार्ग बंद केले. आता बांगलादेशात भारताला अनुकूल असणारे सरकार आहे. याचा फायदा घेऊन बांगलादेशातून होणार्या घुसखोरीबाबत विचार करायला हवा. सीमेपलिकडून भारतात येणार्या बांगलादेशीयांची रोजगाराची गरज लक्षात घेऊन त्यांना तात्पुरता काम करण्याचा व्हिसा किंवा सकाळी भारतात येऊन संध्याकाळी बांगलादेशात परत जाण्याचा व्हिसा, अशा अनेक पर्यायांचा विचार करता येईल. ईशान्य भारत हा भारताचा अविभाज्य भाग आहे असा पुकारा मुंबई किंवा दिल्लीतून करणे सोपे आहे. हीच भावना ईशान्य भारतातील जनतेत निर्माण होणे, हे सर्वात महत्त्वाचे.

**५. भारतातील प्रादेशिक अस्मिता व राष्ट्रीय हितसंबंध**

भारतातील प्रादेशिक अस्मिता व राष्ट्रीय हितसंबंध यांच्यात समतोल साधण्याचे. परराष्ट्र धोरण ठरविण्याचा अधिकार हा केंद्रशासनाचा आहे आणि या धोरणांचा मुख्य उद्देश भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या रक्षणाचा आहे. तथापि गेल्या काही वर्षापासून भारतातील घटक राज्ये आणि तेथील प्रादेशिक पक्ष परराष्ट्रधोरण ठरविण्याचा, नाकारण्याचा, त्यात आडकाठी करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. केंद्रात स्पष्ट बहुमत असलेल्या सरकारचा अभाव असल्याने प्रादेशिक पक्षांनी सौदेबाजीचे राजकारण करत परराष्ट्र धोरणातील अनेक महत्त्वांच्या निर्णयावर यापूर्वी नकाराधिकार वापरला होता. त्यामुळे भारताचे श्रीलंका, बांगलादेशबरोबरचे संबंध दुखावले गेले. नरेंद्र मोदी यांच्या शासनाला स्पष्ट बहुमत असल्यामुळे असा नकाराधिकाराचा प्रश्न भविष्यात उपस्थित होणार नाही. तथापि मोदी यांनी आपल्या निवडणूक प्रचारादरम्यान परराष्ट्र धोरण निर्णय, निर्मितीप्रक्रियेत आपण घटक राज्यांना समाविष्ट करून घेणार असल्याचे स्पष्ट केले होते. परिणामी राष्ट्रीय हितसंबंध आणि प्रादेशिक अस्मिता यांची सांगड कशी घालायची हा त्यांच्यापुढचा मोठा प्रश्न आहे.

**६. एकात्मतेचा अभाव अंतगर्त सुरक्षेसमोर आव्हान**

राष्ट्रीय सुरक्षेसाठी सर्वांनी एकत्र येवून कार्य करण्याची गरज आहे. अंतर्गत व बाह्य सुरक्षेसंदर्भात नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात अनास्था दिसून येते. राष्ट्रीय एकात्मतेचा अभाव आपल्यात मोठ्या प्रमाणात दिसून येतो. हेच अंतगर्त सुरक्षतेसमोरील मोठे आव्हान आहे, नागरिकांच्या सहकार्याशिवाय अंतर्गत सुरक्षा बळकट करता येत नाही, सर्वांनी एकत्र येऊन राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचे मत यावेळी व्यक्त केले. मौर्य कालखंडात अंतर्गत व बाह्य सुरक्षेच्या प्रश्नाविषयी आचार्य चाणक्य यांनी ठोस नितीचा अवलंब केला होता. हीच चाणक्यनिती आज अवलंबविणे गरजेचे आहे, सुरक्षा यंत्रणेसाठी इतर देश मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक करीत आहेत. मात्र भारतात आर्थिक गुंतवणूक इतरांच्या तुलनेत कमी असून, ती वाढविणे आवश्यक आहे. भारतापुढे सुरक्षा यंत्रणेचे सक्षमीकरण, राष्ट्रीय एकात्मतेचा विकास आणि ऊर्जा, तेल व पाणी या संदर्भातील स्वावलंबता हे मोठे आव्हान आहे.

**७. देशातील नागरिकांचा सहभाग**

भारताच्या सीमारेषेवर होणार्या कारवाया, बनावट चलनी नोटा वापरात आणून देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याचे प्रयत्न, मादक पदार्थाचा पुरवठा, सायबर सुरक्षा अशी काही प्रमुख आव्हाने देशाच्या अंतर्गत सुरक्षेसमोर दहशतवाद्यांनी उभी केली असल्याने ही सुरक्षा भक्कम ठेवण्यासाठी देशातील नागरिकांचा सहभाग महत्वपूर्ण आहे. देशातील अंतर्गत सुरक्षेवर प्रकाश टाकला. गेल्या काही वर्षांत दहशतवादी हल्ले वाढले आहेत. मुंबईवरील हल्ला, उत्तर-पूर्व ज्यांमधील कारवाया, नक्षलवाद्यांचे हल्ले यामध्ये असंख्य लोकांचा बळी गेला आहे. लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. देशाची अंतर्गत सुरक्षा ही जबाबदारी केवळ पोलीस, लष्कर अथवा निमलष्करी दलावर आहे असे समजून चालणार नाही. नागरिकांनी देखील या जबाबदारीसाठी पुढे येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. नक्षलवाद्यांच्या कारवाया १६ राज्यांमध्ये वाढल्या आहेत. जेव्हा देशांतर्गत हल्ला होतो. तेव्हा कोणती संघटना त्यात सहभागी आहे हे हल्ल्यावरून लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ –**

१. आवटे संजय, ट्राईस्ट विथ डेस्टिनी, निर्मिक प्रकाशन, पुणे.
२. पाटील व्ही. बी., जागतिक व्यवहारात भारत, के. सागर प्रकाशन, पुणे.
३. पाटील व्ही. बी., भारताचे परराष्ट्र धोरण, प्रशांत प्रकाशन, जळगाव.